# जाहीर निविदा सुचना

नाशिक येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयासाठी ***औषधी व डिस्पोजेबल्स*** पुरवठयासाठी स्पर्धात्मक दर निमंत्रित करण्यात येत आहेत. उत्पादन, विक्री, वितरण क्षेत्रातील ख्यातनाम उत्पादक / पुरवठादारांनी रुग्णालयासाठी आवश्यक विहीत मानके, परिमाण व दर्जानुसार रुग्णालयात पोहोच करण्यासाठी एकत्रित दर विहीत नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे. (**वॅट व टॅक्स यासारखे कर स्वतंत्र दर्शविण्यात येऊ नये, अन्यथा अशा निविदा ग्राहय धरण्यात येणार नाही**)

उपरोक्त बाबींमाठी मोहोरबंद निविदा **२ लिफाफा** पध्दतीने सादर करण्यात याव्यात.

प्रत्येक बाबीसाठी स्वतंत्र विहित निविदा नमुना, निविदेच्या अटी व शर्ती दिनांक २९.०६.२००९ ते दिनांक १७/०७/२००९ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी आणि कार्यालयीन वेळेत दुपारी ०३.०० वाजेपर्यंत प्रत्येकी रुपये १०००/- (नापरतावा) अदा करुन वैद्यकीय अधिक्षक, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, स्व. इंदिरा गांधी चौक, शालीमार, नाशिक यांच्या कार्यालयातून प्राप्त करण्यात याव्यात. मोहोरबंद निविदा दिनांक १७/०७/२००९ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत सादर करण्यात याव्यात. मोहोरबंद निविदा शक्यतो त्याच दिवशी वैद्यकीय अधिक्षक, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, स्व. इंदिरा गांधी चौक, शालीमार, नाशिक यांच्या दालनात सायंकाळी ०५.०० वाजता उघडण्यात येतील. प्राप्त निविदांपैकी कोणतीही एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात येत आहे.

सदर निविदा सुचना वैद्यकीय अधीक्षक, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, स्व. इंदिरा गांधी चौक, शालीमार, नाशिक कार्यालयाच्या सुचना फलकावर लावण्यात आली आहे.

सदर निविदा सुचना महाराष्ट्र शासनाच्या तसेच आरोग्य सेवा संचालनालयच्या वेबसाईटवर सुध्दा प्रसिध्द करण्यात आली आहे

वैद्यकीय अधीक्षक,
विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय,
नाशिक.